ePaper

वर्ष - 9 । अंक -47 | UDYAM-MH-26-0158827

# दिवाळी गोड होणार, शेतकऱ्यांना पीएम किसानचे 2000 रुपये मिळण्यास सुरुवात



महाईन्यूज ™

आतील पानांत


- मी काय तुझी गर्लफ्रेंड आहे का?
- रोहित कधीच सातत्याने धावा करत नाही
- अदानींसाठी नियम बदलायला तयार
- निवडणुकीत त्यांना महत्त्व नाही


www.mahaenews.com | ।गुरुवार, दि. 9 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

## नवी मुंबईनंतर ‘वाढवण’ ठरणार चौथी मुंबई

# चौथ्या मुंबईची घोषणा!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं ठिकाण

। नवी मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण पार पडलं. या ऐतिहासिक सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रासाठी मोठी घोषणा केली – “नवी मुंबई विमानतळाजवळ तिसरी आणि वाढवणजवळ चौथी मुंबई उभारली जाणार आहे.”**



### “हा एअरपोर्ट म्हणजे इंजिनिअरिंग मार्बल” – फडणवीस

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, “हा एअरपोर्ट इंजिनिअरिंग मार्बल आहे. या ठिकाणी डोंगर तोडावा लागला, नदीचा प्रवाह बदलावा लागला आणि त्यातून एवढा सुंदर एअरपोर्ट उभा राहिला. हा भारताच्या विकासात मोलाची भूमिका बजावणार आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या जीडीपीमध्ये १ टक्का वाढ होईल.” त्यांनी पुढे सांगितले, “वॉटर टॅक्सीची सुविधा येथे सुरू होत आहे. त्यामुळे नवी मुंबईहून गेटवे ऑफ इंडियापर्यंत थेट प्रवास शक्य होईल. मोदीजी महाराष्ट्राच्या पाठीमागे डोंगरासारखे उभे आहेत, त्यामुळे आता महाराष्ट्र थांबणार नाही.”

### 19,650 कोटींचा प्रकल्प; 90 दशलक्ष प्रवासी हाताळण्याची क्षमता

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा तब्बल 19,650 कोटी रुपये खर्चून उभारण्यात आला आहे. पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यावर हे विमानतळ दरवर्षी 90 दशलक्ष प्रवासी हाताळू शकेल. यामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

### मेट्रो-३ पूर्ण क्षमतेने सुरू; आरे ते कफ परेड थेट जोडणी

मुंबई मेट्रो लाईन-३ चा अंतिम टप्पा आजपासून प्रवाशांसाठी खुला झाला आहे. हा टप्पा आचार्य अत्रे चौक ते कफ परेड असा असून, यामुळे आरे–कफ परेड असा थेट प्रवास शक्य झाला आहे. यामुळे मुंबईकरांचा प्रवास अधिक जलद, सुखकर आणि पर्यावरणपूरक ठरणार आहे.

### मोदींची एक बैठक आणि क्षणात सुटले आठ अडथळे!

या लोकार्पण सोहळ्यात फडणवीसांनी एक रंजक माहिती दिली. “या प्रकल्पाच्या ८ एनओसी अडकल्या होत्या. मोदींनी पहिल्याच बैठकीत सात एनओसी मंजूर करून दिल्या, आणि १५व्या दिवशी आठवी एनओसीही मिळाली. जे काम १० वर्षांत झालं नाही, ते मोदींच्या एका बैठकीत झालं,” असं फडणवीस म्हणाले.

### “मोदींच्या पाठीशी असल्यामुळे महाराष्ट्र झेप घेतोय”

मुख्यमंत्री म्हणाले, “मुंबईत देशातील सर्वात मोठी अंडरग्राऊंड मेट्रो तयार होत आहे. उत्तर आणि दक्षिण मुंबई जोडणाऱ्या या मेट्रोमुळे प्रवासात मोठी सोय होईल. प्रत्येक क्षणाला केंद्र सरकार आमच्या पाठीशी होते, म्हणून सर्व अडथळे पार करता आले.”

### चौथी मुंबई म्हणजे वाढवण विकासाचा नवा अध्याय

फडणवीसांच्या या घोषणेमुळे ‘चौथी मुंबई’ म्हणून ओळखली जाणारी वाढवण ही जागा आता विकासाचा नवा अध्याय लिहिणार आहे. या परिसरात बंदर, विमानतळ आणि पायाभूत सुविधांचा प्रचंड विकास अपेक्षित आहे.

## महाराष्ट्राचा जीडीपी एका टक्क्याने वाढणार : मुख्यमंत्री

“या विमानतळासाठी आपण डोंगर सपाट केला, नदीचं पात्र वळवलं, अशा अनेक गोष्टी केल्या. मी खात्रीने सांगतो की हे एक विमानतळ महाराष्ट्राचा जीडीपी एका टक्क्याने वाढवू शकतो. या विमानतळाला आता वॉट टॅक्सीची देखील सुविधा मिळणार आहे.” देवेंद्र फडणवीस म्हणाले, “महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेण्यासाठी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. तसेच नागरी उड्डाण मंत्रालयाचेही आभार मानतो. नागरी उड्डाण मंत्री के. नायडू मघाशी म्हणाले, ‘आपलं पुढचं लक्ष्य हे वाढवण बंदर असेल.’ हे बंदर मोदी यांनी आपल्याला भेट म्हणून दिलं आहे. तिथेच देशातील पहिलं ऑफशोर विमानतळ उभारणार आहोत. आपल्या नवी मुंबई विमानतळाजवळ तिसरी मुंबई होणार आहे. वाढवणजवळ चौथी मुंबई होईल असा विश्वास मी यानिमित्ताने तुम्हाला देऊ इच्छितो.

नव्या निकषांतही त्रुटी

## नवे पात्रताधारक वंचित राहण्याचा आक्षेप

# प्राध्यापक भरतीच्या नव्या निकषांतही त्रुटी

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील शासकीय अकृषी विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या भरतीप्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तयार केलेल्या निकषांतील त्रुटींवर शिक्षणतज्ज्ञांनी बोट ठेवले आहे. प्राध्यापक पदभरतीमध्ये शैक्षणिक पात्रता आणि मुलाखतीसाठी समान महत्त्व देण्याची गरज व्यक्त करण्यात आली असून, या निकषांमुळे घड्याळी तासिका तत्त्वावरील, तसेच कंत्राटी प्राध्यापक, नवे पात्रताधारक यांना संधीच मिळणार नसल्याचा आक्षेप नोंदविला जात आहे.**

## निवडीचे निकष नव्याने जाहीर



प्राध्यापक भरतीप्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी राज्यपाल कार्यालयाने दिलेल्या निर्देशांनुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक या पदांच्या निवडीचे निकष नव्याने जाहीर केले आहेत. त्यात शैक्षणिक, अध्यापन, संशोधनासाठी ७५ गुण, तर मुलाखतीसाठी २५ गुण निश्चित करण्यात आले आहेत. उमेदवारांची गुणवत्तायादी तयार करताना एकूण शंभर गुण विचारात घ्यावे लागणार आहेत. तसेच शैक्षणिक, अध्यापन, संशोधनासाठीच्या गुणांपैकी किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरणार आहेत.

प्रत्येक रिक्त जागेसाठी किती उमेदवारांना मुलाखतीला बोलवायचे याचे प्रमाण ठरविण्याची मुभा विद्यापीठांना देण्यात आली आहे.

तसेच उमेदवाराच्या पात्रतेमध्ये परदेशी विद्यापीठांतून, आयआयटीसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांतून, केंद्रीय-राज्य विद्यापीठांतून मिळवलेली पदवी, पदव्युत्तर पदवी, अभ्यासक्रमनिर्मितीतील योगदान, पीएचडी मार्गदर्शन, पुरस्कार, संशोधन, बौद्धिक संपदानिर्मिती, संशोधनासाठी मिळवलेला निधी अशा घटकांसाठीही गुणनिश्चिती करण्यात आली आहे.'प्राध्यापक भरतीसाठी केलेल्या निकषांमुळे गुणवत्तापूर्ण प्राध्यापकांच्या निवडीत तडजोड होऊ शकते. प्राध्यापक भरती ही पूर्णपणे गुणवत्ताधारितच असायला हवी. त्यामुळे मुलाखत आणि शैक्षणिक पात्रता याला समान महत्त्व असले पाहिजे. केवळ प्राध्यापक पदासाठीच नाही, तर सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापकांनाही मुलाखतीवेळी सादरीकरणाचा निकष असल्यास त्यांचे अध्यापनकौशल्य, संवादकौशल्य तपासता येऊ शकते. मात्र, सध्याच्या निकषांमध्ये त्यासाठी काहीच वाव ठेवण्यात आलेला नाही. निकषांतील बौद्धिक संपदानिर्मितीसारखे निकष मानव्य विज्ञानातील उमेदवारांसाठी अन्यायकारक आहे,'

याकडे एका माजी कुलगुरूंनी लक्ष वेधले.विद्यापीठांतील प्राध्यापक भरतीप्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी ठरवलेली कार्यपद्धती ही पात्रताधारकांच्या डोळ्यांत धूळफेक करणारी आहे. आजवर घड्याळी तासिका तत्त्व या नावाखाली आर्थिक शोषण सहन करून काम करत असलेल्या अध्यापकांचा ११ महिन्यांनंतर खंडित होणारा अनुभव या नव्या प्रक्रियेत ग्राह्य धरला जात नाही, ही अन्यायकारक बाब आहे. नुकतीच पात्रता प्राप्त केलेल्या उमेदवारांकडून संशोधन, पेटंट, ग्रंथप्रकाशन, शोधनिबंध, राष्ट्रीय पुरस्कार, अध्यापनाच्या अनुभवाची अपेक्षा वास्तवदर्शी नाही. भरतीप्रक्रियेत शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन व अन्य निकषांना जरी ७५ टक्के महत्त्व असले, तरी मुलाखतीला दिलेले २५ गुण हे शासनाच्या पारदर्शक प्रक्रियेच्या दाव्याला फोल ठरवतात. या गुणांकनामध्ये मनमानी निर्णयास वाव राहतो. त्यामुळे हे निकष पारदर्शकतेऐवजी अनिश्चित आणि अन्यायकारक आहेत,' असे नेट-सेट, पीएचडीधारक संघर्ष समितीचे प्रा. सुरेश देवढे पाटील यांनी सांगितले.

### हे गुणवत्तेचे निदर्शक नाहीत

प्राध्यापक पदभरती गुणवत्तेच्याच आधारे होणे गरजेचे आहे. उमेदवारांची पात्रता, शैक्षणिक कामगिरीसाठी गुणनिश्चिती गुणवत्ता गुणांमध्ये अडकवणे योग्य नाही. गुण हे गुणवत्तेचे निदर्शक नाहीत. प्राध्यापक हे विद्यार्थ्यांसाठी 'रोल मॉडेल' असले पाहिजेत. त्यामुळे पात्रता आणि मुलाखत याला समान महत्त्व दिले पाहिजे.

– डॉ. भूषण पटवर्धन, माजी उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग

# महाबळेश्वरमधून गुजबेरीची आवक

## आंबट-गोड चवीच्या गुजबेरी बाजारात 400 ते 650 रुपये किलो

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आंबट-गोड चवीच्या गुजबेरीचा हंगाम सुरू झाला आहे. महाबळेश्वरमधून मार्केट यार्डातील फळबाजारात गुजबेरीची आवक सुरू झाली आहे. घाऊक बाजारात महाबळेश्वरमधून दररोज १० ते १५ किलो गुजबेरीची आवक होत आहे.**



आंबट-गोड चवीच्या गुजबेरीची लागवड महाबळेश्वर आणि नाशिक भागात केली जाते. गुजबेरी लागवडीस थंड हवामानाची आवश्यकता असते. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात गुजबेरीचा हंगाम सुरू होतो. हंगामाच्या पहिल्या टप्प्यात महाबळेश्वर, वाई परिसरातील शेतकरी गुजबेरी विक्रीस पाठवितात. मार्केट यार्डातील फळबाजारात महाबळेश्वरमधील शेतकरी नीलेश पवार यांनी गुजबेरी विक्रीस पाठविली आहे. गुजबेरीला मागणी चांगली असून घाऊक बाजारात एक किलो गुजबेरीला प्रतवारीनुसार ३०० ते ५०० रुपये भाव मिळाला आहे,' अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फळ व्यापारी जेसाराम मनुमल यांनी दिली.'गुजबेरीचा हंगाम मे महिन्यापर्यंत सुरू राहतो. हंगामाचा दुसरा टप्पा डिसेंबर महिन्यात सुरू होतो. डिसेंबर महिन्यात गुजबेरीची आवक वाढते. डिसेंबरमध्ये साधारणपणे बाजारात दररोज १०० किलो गुजबेरीची आवक होते. महाबळेश्वर, नाशिक भागातील शेतकरी गुजबेरी विक्रीस पाठवितात. त्यानंतर गुजबेरीचे दर कमी होतात. आवक वाढल्यानंतर एक किलोचे भाव प्रतवारीनुसार ८० ते २५० रुपयांपर्यंत स्थिरावतात. मे महिन्यापर्यंत गुजबेरीची आवक सुरू राहते. पावसाळा सुरू झाल्यानंतर हंगामाचा शेवट होतो,' असे त्यांनी नमूद केले.

### गुजबेरी मधुमेहावर गुणकारी

गुजबेरी मधुमेहावर गुणकारी असल्याने मधुमेहींकडून गुजबेरीला मागणी असते. गुजबेरीला पुणे, मुंबईतील ग्राहकांकडून सर्वाधिक मागणी असते.हंगामाच्या पहिल्या टप्प्यात महाबळेश्वर, वाई परिसरातील शेतकरी गुजबेरी विक्रीस पाठवितात. मार्केट यार्डातील फळबाजारात महाबळेश्वरमधील शेतकरी नीलेश पवार यांनी गुजबेरी विक्रीस पाठविली आहे.

आयुक्तांची प्रांजळ कबुली... “बंदिस्त पवना जलवाहिनी

# प्रकल्प रखडल्याची खंत – आयुक्त शेखर सिंह

## “प्रकल्प पूर्ण झाल्यास शहराची पाण्याची चिंता मिटेल”

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“बंदिस्त पवना जलवाहिनी करु शकलो नाही, याची खंत आहे,” अशी प्रांजळ कबुली पिंपरी-चिंचवडचे आयुक्त शेखर सिंह यांनी बुधवारी दिली. “त्या प्रकल्पासाठी लागणारा खर्च मोठा होता आणि राज्य शासनाची मदत आवश्यक होती. हे काम वेळेत झालं असतं, तर शहरात आज एक दिवसाआड पाणीपुरवठा बंद ठेवण्याची वेळ आली नसती,” असं सिंह यांनी स्पष्ट सांगितलं.**



मंगळवारी (दि. ७) त्यांच्या बदलीचे आदेश लागल्यानंतर बुधवारी (दि. ८) त्यांनी पत्रकारांशी अनौपचारिक संवाद साधला. “वाकड येथील विकसकाला कामाच्या बदल्यात दिलेला टीडीआर आणि कुदळवाडी येथील अनधिकृत बांधकामांवर केलेली कारवाई या दोन गोष्टींमुळे थोडा त्रास झाला. पण हे निर्णय पूर्णपणे प्रशासकीय दृष्टिकोनातून आणि महापालिकेच्या हितासाठीच घेतले होते,” असं सिंह म्हणाले. “मुळशी आणि ठोकळवाडी धरणाचे पाणी शहरात आणण्याचे प्रयत्न केले; मात्र ते पूर्णत्वाला जाऊ शकले नाहीत,” असेंही त्यांनी नमूद केलं.

### अर्बन स्ट्रीट हा भविष्यासाठी योग्य मार्ग

वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून सुरू असलेल्या ‘अर्बन स्ट्रीट’ प्रकल्पाबद्दल बोलताना सिंह म्हणाले, “हा प्रयोग आज काहींना योग्य वाटत नसला तरी भविष्यात तोच शाश्वत उपाय ठरणार आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि बीआरटी अधिक सक्षम झाली, तर या प्रकल्पाचा फायदा नक्कीच नागरिकांना होईल.”

### पिंपरी-चिंचवड महापालिका देशात वेगळ्या उंचीवर

“पिंपरी-चिंचवड महापालिका देशभरात स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाली आहे,” असा अभिमानही सिंह यांनी व्यक्त केला. “मोशी येथील कचऱ्यातून वीजनिर्मिती प्रकल्पाने महापालिकेची ओळख देशपातळीवर नेऊन ठेवली आहे. विविध पुरस्कारांनीही या शहराचा गौरव झाला आहे,” असं ते म्हणाले.

# हरनाम सिंह ते शेखर सिंह पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी “एक पाऊल पुढे”

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची भावना, मावळते आयुक्त शेखर सिंह यांना सदिच्छा

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेची स्थापना 1982 साली झाली. त्यानंतर शहराचे प्रशासकीय प्रमुख म्हणून आजवर 26 आयुक्तांनी काम केले. गेल्या 43 वर्षांमध्ये प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपआपल्या परीने शहराच्या विकासात योगदान दिले आहे. सनदी अधिकारी श्रीकर परदेशी, श्रावण हर्डिकर आणि शेखर सिंह यांची कारकीर्द शहराच्या विकासासाठी “एक पाऊल पुढे” राहिली आहे, अशी भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.**




महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची मंगळवारी बदली झाली. त्यांना 2026 मध्ये नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळाची प्रशासकीय जबादारी मिळाली आहे. मार्च-2022 मध्ये सिंह यांची महापालिकेचा पदभार स्वीकारला होता. त्यांचा 3 वर्षांचा कार्यकाळ ऑगस्ट 2025 मध्ये पूर्ण झाला आहे. या निमित्ताने आमदार महेश लांडगे यांनी महापालिका मुख्यालय येथे आयुक्त सिंह यांची सदिच्छा भेट घेतली. तसेच, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित कादंबरी भेट दिली आणि नव्या जबाबदारीसाठी शुभसंदेशही दिला.

आमदार लांडगे म्हणाले की, शहराच्या स्थापनेपासून प्रलंबित असलेले विषय मार्गी लावण्याची धमक शेखर सिंह यांनी दाखवली. प्रशासकीय राजवटीतसुद्धा त्यांनी धाडसी निर्णय घेतले. श्रीकर परदेशी, श्रावण हर्डिकर आणि शेखर सिंह असे शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या आयुक्तांची नावे शहराच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिली जातील.

वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी, बायोडायव्हर्सिटी पार्क, डीपी रस्त्याचा विकास, आंद्रा-भामा आसखेड प्रकल्पाची अंमलबजावणी, संविधान भवन उभारणी, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय उभारणी, महापालिका प्रशासकीय भवन उभारणी, मोशीतील प्रस्तावित 850 बेडचे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ग.दी. माडगुळकर नाट्यगृत उभारणी आणि प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे केलेली अंमलबजावणी अशी अनेक कामे आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक भूमिकेतून मार्गी लावली. समाविष्ट गावांच्या विकासाला चालना देण्यात आली, असेही आमदार लांडगे म्हणाले.

कुदळवाडी अतिक्रमण कारवाई सारख्या कठोर निर्णयांमुळे आयुक्त शेखर सिंह टीकेचे धनी झाले. मात्र, ती कारवाई सरसकट का झाली? याचाही विचार केला पाहिजे. महापालिका विकास आराखड्यातील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यासाठी त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली. यासह चिखली आणि चऱ्होलीच्या ग्रामस्थांचा विरोध असलेली प्रस्तावित टीपी स्कीम रद्द करण्याचा निर्णयही आयुक्त सिंह यांनी घेतला. त्यामुळे अत्यंत धाडसी निर्णय घेणाऱ्या शेखर सिंह यांची कारकीर्द शहराच्या वाटचालीमध्ये निर्णायक म्हणून अधोरेखित होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांच्या कामगिरीची दखल घेतली. त्यामुळेच त्यांना नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळाची महत्त्वपूर्ण जबाबदारी दिली असावी. तब्बल 24 हजार कोटी रुपयांचे बजेट असलेला हा सोहळा आयुक्त सिंह यांच्या प्रशासकीय नियंत्रणात होणार आहे, ही निश्चितच उल्लेखनीय बाब आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

“ पिंपरी-चिंचवडमध्ये गेल्या तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट होती. मात्र, या दोलायमान राजकीय व प्रशासकीय स्थितीमध्ये आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासकीय नेतृत्त्वाची चुणूक दाखवली. विकासकामे आणि धोरणात्मक निर्णयाबाबत अनेकदा आमचे मतभेद झाले आहेत. मात्र, शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी कायम सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांची भेट घेतली आणि पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

**-महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**




# संस्कृतीचा स्वीकार करण्याचा सल्ला

**सर्वोच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी वर्धापनदिन समारंभात एकीककडे सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी न्यायपालिकेने आपल्या पारंपरिक कामकाजाच्या पद्धतीत बदल करून व्यायसायिक संस्कृतीचा स्वीकार करण्याचा सल्ला दिला.**

न्यायाधीश भूषण गवई यांनी नुकतेच सुनावले. अर्थात न्यायपालिकेतील अधिकाऱ्यांना त्यांच्या वरिष्ठांनी सुनावण्याची ही पहिलीच वेळ नाही. गेल्या ऑगस्टमध्ये उच्च न्यायालय हे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात आदेश देऊ शकत नाही, अशा कडक शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने गुजरात उच्च न्यायालयाला ठणकावले होते. गुजरातमधील न्यायाधीशांच्या कार्यपद्धतीबद्दल सर्वोच्च न्यायालयाने नापसंती व्यक्त केलेली असतानाच पश्चिम बंगाल उच्च न्यायालयात दोन वेगवेगळे न्यायमूर्ती परस्परांच्या आदेशांना स्थगिती देत असल्याचा पोरखेळ सुरू होता. शेवटी सर्वोच्च न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करावा लागला.गुजरातमध्ये न्यायपालिकेचे कामकाज कसे चालते यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात आलेले एक प्रकरण फारच बोलके आहे. एका उद्योगपतीला सर्वोच्च न्यायालयाने गेल्या डिसेंबरमध्ये अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. तरीही गुजरात



पोलिसांनी त्या उद्योगपतीला अटक केली आणि न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्याला पोलीस कोठडी सुनावली. आरोपीच्या वकिलाने सर्वोच्च न्यायालयाच्या अटकपूर्व जामिनाची कागदपत्रे सादर केलेली असतानाही पोलीस आणि न्यायालयाने कारवाई केली. यावरून सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ संतापले. अटकपूर्व जामीन मंजूर असतानाही आरोपीची पोलीस कोठडीत चौकशी करण्यास परवानगी देण्याच्या गुजरातमधील न्यायपालिकेच्या कार्यपद्धतीवर न्या. भूषण गवई आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठाने संताप व्यक्त केला. अशा कृतीतून वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकारांचा उद्देश सफल होत नाही, असे निरीक्षण खंडीपाठाने नोंदविले. या खटल्यात गुजरात उच्च न्यायालयाला प्रतिवादी करण्यात आले आहे. अटकपूर्व जामीन किंवा नियमित जामीन मंजूर करण्याच्या आदेशातच चौकशी अधिकारी आरोपीच्या पोलीस कोठडीची मागणी करू शकतो ही गुजरातमधील सर्रास प्रथा असल्याचे महान्याय अभिकर्ता (सॉलिसिटर जनरल) तुषार मेहता यांनी निदर्शनास आणताच गुजरातसाठी वेगळे कायदे आहेत का, हा सवाल करत सर्वोच्च न्यायालयाने यामुळे भारतीय दंड संहितेतील अटकपूर्व जामिनासंदर्भातील ४३८ व्या कलमाचा उद्देश सफल होत नाही, असे निरीक्षण नोंदविले. याबाबतीतील 'गुजरातमधील न्यायाधीशांना योग्य प्रशिक्षण दिले जावे', हे सर्वोच्च न्यायालयाचे मत म्हणजे खरे तर गुजरातमधील न्यायपालिकेवर ओढलेले खरमरीत ताशेरेच आहेत.गेल्या ऑगस्टमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात गुजरात उच्च न्यायालयाने आदेश दिला होता. तेव्हाही सर्वोच्च न्यायालयाने गुजरात उच्च न्यायालयाला चांगलेच तासले होते. 'देशातील कोणतेही न्यायालय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात आदेश देऊ शकत नाही. तसे करणे हे घटनेच्या तत्त्वाच्या विरोधात असल्या'चे मत नोंदवून सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त केली होती. आता तर गुजरातमध्ये जामिनावर दंड संहितेतील तरतुदीच्या विरोधात आदेश देण्याची प्रथाच असल्याचे समोर आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढल्यावर तरी गुजरातमधील न्यायालये दंड संहिता किंवा घटनेतील तरतुदींचे पालन करतील ही अपेक्षा. पश्चिम बंगाल उच्च न्यायालयात सुरू असलेला पोरखेळ बघून हे उच्च न्यायालय की राजकीय अड्डा, असा प्रश्न निर्माण व्हावा. वैद्याकीय प्रवेश सुलभ व्हावेत म्हणून पश्चिम बंगाल सरकारमधील उच्चपदस्थ जातीची खोटी प्रमाणपत्रे देत असल्याची याचिका सुनावणीसाठी आली असता न्या. अभिजीत गंगोपाध्याय यांनी सीबीआय चौकशीचा आदेश दिला. त्यावर दोन सदस्यीय खंडपीठाने त्याला स्थगिती दिली. यावर गंगोपाध्याय यांच्या एक सदस्यीय खंडपीठाने पुन्हा सीबीआय चौकशीचा आदेश दिला. त्याला पुन्हा द्विसदस्यीय खंडपीठाने स्थगिती दिली. गंगोपाध्याय हे भाजपचे पाठीराखे असून ते भविष्यात भाजपच्या वतीने

## प्रासंगिक »

### राष्ट्राध्यक्षीय अराजक!

***अमेरिकेतील डेमोक्रॅटशासित राज्यांमध्ये नॅशनल गार्डना धाडण्याचे प्रकार बिनदिक्कत सुरू झाले आहेत. बहुतेक सगळे टेक्सासमधून धाडले जातात, कारण ट्रम्पवादाची ती प्रयोगशाळाच!***

अमेरिकेच्या सर्व उच्चपदस्थ सैन्याधिकाऱ्यांना काही दिवसांपूर्वी वॉशिंग्टनजवळ पाचारण करण्यात आले. अमेरिकेतून तसेच जगभर विखुरलेल्या अमेरिकेच्या लष्करी, नाविक आणि हवाई तळांवरून काही शेकडा जनरल्स, अ‍ॅडमिरल्स या अमेरिकी राजधानीत दाखल झाले. तेथे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांनी त्यांचे बौद्धिक घेतले. ३०-४० वर्षे सैन्यदलांमध्ये व्यतीत केलेल्या या मंडळींसमोर, ते जणू नुकतेच लष्करी अकादमीत दाखल झालेले युवक आहेत अशा पद्धतीने बालिश सादरीकरण झाले. धमकीची भाषा, बढाईखोरी, थापेबाजी, अपमान वगैरे ट्रम्प संप्रदायी सोपस्कार उभयतांकडून साभिनय सादर झाले. अत्यंत स्थितप्रज्ञ मुद्रेने हा अत्याचार उपस्थित अधिकाऱ्यांनी सहन केला. पण एका संदेशवजा आदेशाने त्यांच्यातील भलेभलेही मनातून हादरले.

**"सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!! राजकीय क्षेत्रात करिअर करू पाहणाऱ्या होतकरूंसाठी सुवर्णसंधी!!! २०१४ नंतर देशाच्या राजकारणाचा नूर पूर्णपणे पालटून गेल्याचे तुम्ही जाणताच. विविध कसरती करून ती टिकवायची कशी याचे प्रशिक्षण देण्यासाठी आमच्या 'नितीश' अकॅडमीतर्फे एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.**

# देशभरात सर्वत्र 'पलटूराम' तयार झाले

सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी अगदी वाजवी शुल्क आकारले जाईल. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्यापासून प्रेरणा घेत आम्ही हा उपक्रम सुरू केला. त्यांनीही त्यांचे नाव वापरण्याची संमती अतिशय आनंदाने दिली. मुळात नितीश ही एक व्यक्ती नसून प्रवृत्ती आहे व त्याचा सार्वत्रिक प्रसार होऊन ती सर्वार्थाने रूढ व्हायला हवी असा मानस त्यांनी व्यक्त केल्याने हा उपक्रम सुरू करण्यात आला.महिनाभर चालणाऱ्या या कार्यशाळेत कधी पक्ष न बदलता तर कधी बदलून सत्तेची खुर्ची कायम कशी राखायची, फारसा वादविवाद न होऊ देता सुलभ सत्तांतर कसे घडवून आणायचे, हे करताना चेहऱ्यावरचे भाव निरागस कसे ठेवायचे, यासंदर्भातील प्रत्येक कृतीला नैतिकतेची जोड कशी द्यायची, यातून समजा प्रतिमाभंगाचा धोका उद्भवलाच तर त्याचे संवर्धन कसे करायचे, सामान्य लोक तसेच माध्यमांनी 'पलटूराम' म्हटले तरी न चिडता निर्व्याज कसे हसायचे, आधी




विरोधकांविषयी केलेली वक्तव्ये नंतर त्यांनाच सोबत घेतल्यावर कशी विसरायची, त्यासंदर्भात कुणी आठवण करून दिलीच तर ऐकू न आल्याचा अभिनय कसा करायचा, पलटी मारण्याच्या प्रत्येक कृतीचे समर्थन करताना त्याला राज्य तसेच जनतेच्या हिताशी कसे जोडायचे, मागास असल्याचा आव कधी व केव्हा आणायचा, यावर मान्यवरांकडून मार्गदर्शन केले जाईल. यात सहभागी होणारा प्रत्येक होतकरू पक्ष काढू शकणार नाही. प्रत्येकालाच मुख्यमंत्री पदाची संधी मिळणार नाही याची पूर्ण कल्पना आम्हाला आहे. मात्र माननीय नितीशकुमारांनी केलेला हा ऐतिहासिक प्रयोग सत्ताकारणात समाविष्ट असलेल्या अगदी खालच्या पदापर्यंत झिरपावा हाच या कार्यशाळेमागील हेतू आहे. देशभरात सर्वत्र असे 'पलटूराम' तयार झाले तर आपसूकच या प्रवृत्तीला प्रतिष्ठा प्राप्त होईल व त्याचे जनक म्हणून नितीशकुमारांचे नाव इतिहासात अजरामर होईल. यात सहभागी होणाऱ्या होतकरूंच्या राजकीय विचाराची पाटी शक्यतो कोरी असावी.

तो समाजवादी असला तरी काही हरकत नाही. अलीकडे अस्ताला गेलेला हा विचार किमान या माध्यमातून तरी जिवंत ठेवता येईल अशी खुद्द कुमारांचीच अपेक्षा आहे. कार्यशाळेत दिवसभराच्या मार्गदर्शनानंतर सायंकाळच्या सत्रातील एक तास विविध प्रजातींचे सरडे न्याहाळण्यासाठी राखीव ठेवला जाईल. काचेच्या पेटीत ठेवलेले हे सरडे किती काळात रंग बदलतात, केशरी, पांढरा, हिरवा, पिवळा रंग त्यांच्या शरीरावर कसा उमलतो याचे निरीक्षण तुम्हाला अगदी बारकाईने करावे .

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरवले** पोलीस अधीक्षकांची मराठा समाज शिष्टमंडळाला माहिती

# मराठा आरक्षण आंदोलनाचे 11 गुन्हे मागे!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षण मागणीसाठी गेल्या वर्षी सन २०२४ या वर्षात झालेल्या आंदोलनाच्या निमित्ताने दाखल झालेले ११ गुन्हे मागे घेण्यासाठी जिल्हास्तरीय त्रिसदस्य समितीने पात्र ठरवले आहेत. उर्वरित गुन्ह्यांचीही तपासणी सुरू करण्यात आली आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळास ही माहिती दिल्याचे ॲड. अनुराधा येवले यांनी सांगितले.**

## गुन्ह्यांची छाननी :पोलीस अधीक्षक



या शिष्टमंडळात ॲड. गजेंद्र दांगट, ॲड. हरीश भामरे, मदन आढाव, वैभव भोगाडे, स्वप्निल दगडे, अभय शेडगे, नीलेश सुबे, राम जरांगे, संदीप जगताप, प्रमोद कोरडे, सिद्धान्त पानसरे, भारत भोसले, रमेश मुंगसे, सागर भोसले, जगन्नाथ निमसे, सोमनाथ गुंड, राम सातपुते आदी उपस्थित होते. अधिक माहिती देताना ॲड. अनुराधा येवले यांनी सांगितले, की श्रीरामपूर तालुका पोलीस ठाणे (८५/ २०२४), कोपरगाव शहर पोलीस ठाणे (८४/२०२४), कोपरगाव तालुका (५२/२०२४), भिंगार कॅम्प (२७१ व १७२/२०२४), कोतवाली (२२३/२०२४), एमआयडीसी (१७१ व १७२/२०२४), श्रीगोंदे (२१५ व २१६/२०२४), शेवगाव पोलीस ठाणे (१५५/२०२४) या गुन्ह्यांचा मागे घेण्याच्या प्रक्रियेत समावेश करण्यात आला आहे. भारतीय दंडविधान कलम ३४१, १४३, १८८ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१), १३५, ३७ (१) (३) आदी कलमांन्वये दाखल झालेले हे गुन्हे पात्र ठरवले गेले आहेत.हैदराबाद गॅझेटमधील नोंदीनुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र दिले जावे या मागणीसाठी मनोज जारंगे पाटील यांनी मुंबईत पाच दिवस आंदोलन केले होते.

त्यानंतर सरकारने तसे आश्वासन दिले होते. मनोज जरांगे व मंत्रिमंडळाच्या उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांच्यामधील चर्चेनुसार तसे आश्वासनही दिले गेले होते. त्यानंतर सन २०२४ मधील मराठा आरक्षण आंदोलनासंदर्भात दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी ११ गुन्हे मागे घेण्यासाठी जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने पात्र ठरवले आहेत. आता हे गुन्हे मागे घेण्यासाठी पुढील न्यायालयीन प्रक्रिया केली जाणार आहे. उर्वरित गुन्ह्यांचीही तपासणी केली जात असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी सांगितले. राज्य सरकारने यापूर्वीही मराठा आंदोलनासंदर्भात दाखल झालेले गुन्हे गृह विभागाच्या परिपत्रकातील निकषानुसार मागे घेण्याची प्रक्रिया राबवली होती. या गुन्ह्यांची छाननी करण्यासाठी अतिरिक्त पोलीस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे.या शिष्टमंडळात ॲड. गजेंद्र दांगट, ॲड. हरीश भामरे, मदन आढाव, वैभव भोगाडे, स्वप्निल दगडे, अभय शेडगे, नीलेश सुबे, राम जरांगे, संदीप जगताप, प्रमोद कोरडे, सिद्धान्त पानसरे, भारत भोसले, रमेश मुंगसे, सागर भोसले, जगन्नाथ निमसे, सोमनाथ गुंड, राम सातपुते आदी उपस्थित होते. अधिक माहिती देताना ॲड. अनुराधा येवले यांनी सांगितले, की श्रीरामपूर तालुका पोलीस ठाणे (८५/ २०२४), कोपरगाव शहर पोलीस ठाणे (८४/२०२४), कोपरगाव तालुका (५२/२०२४), भिंगार कॅम्प (२७१ व १७२/२०२४), कोतवाली (२२३/२०२४), एमआयडीसी (१७१ व १७२/२०२४), श्रीगोंदे (२१५ व २१६/२०२४), शेवगाव पोलीस ठाणे (१५५/२०२४) या गुन्ह्यांचा मागे घेण्याच्या प्रक्रियेत समावेश करण्यात आला आहे. भारतीय दंडविधान कलम ३४१, १४३, १८८ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१), १३५, ३७ (१) (३) आदी कलमांन्वये दाखल झालेले हे गुन्हे पात्र ठरवले गेले आहेत.हैदराबाद गॅझेटमधील नोंदीनुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र दिले जावे या मागणीसाठी मनोज जारंगे पाटील यांनी मुंबईत पाच दिवस आंदोलन केले होते. त्यानंतर सरकारने तसे आश्वासन दिले होते. विखे यांच्यामधील चर्चेनुसार तसे झालेल्या गुन्ह्यांपैकी ११ गुन्हे मागे घेण्यासाठी जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने पात्र ठरवले आहेत.

### न्यायालयीन प्रक्रिया केली जाणार

उर्वरित गुन्ह्यांचीही तपासणी केली जात असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी सांगितले.राज्य सरकारने यापूर्वीही मराठा आंदोलनासंदर्भात दाखल झालेले गुन्हे गृह विभागाच्या परिपत्रकातील निकषानुसार मागे घेण्याची प्रक्रिया राबवली होती. या गुन्ह्यांची छाननी करण्यासाठी अतिरिक्त पोलीस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे.

# चार प्रभागांना खुल्या प्रवर्गाची लॉटरी

## इतर मागास प्रवर्गासाठी 14, अनुसूचित जातीसाठी सहा प्रभाग

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सातारा पालिकेच्या २५ प्रभागांची आरक्षण सोडत बुधवारी काढण्यात आली. प्रभाग क्रमांक ७, १४, २० आणि २२ या चार प्रभागांमध्ये खुल्या प्रवर्गाची आरक्षणे जाहीर झाल्याने येथे जोरदार मोर्चेबांधणी पाहायला मिळणार आहे.**



याशिवाय इतर मागास प्रवर्गासाठी १४ प्रभाग तर अनुसूचित जातीसाठी सहा व जमातीसाठी एक प्रभाग आरक्षित करण्यात आला आहे. साताऱ्याचे प्रांत आशिष बारकुल व पालिका प्रशासक अभिजित बापट यांच्या मार्गदर्शनाखाली ही आरक्षण सोडत प्रक्रिया राबवण्यात आली. अभिजित बापट यांनी आरक्षण सोडतीची माहिती दिली. निवडणूक निरीक्षक मोहन प्रभुणे यांनी सोडतीची प्रत्यक्ष प्रक्रिया पार पाडली. नगरपालिका शाळेतील मुलींच्या व मुलांच्या हस्ते आरक्षणाच्या चिठ्ठ्या काढण्यात आल्या. प्रथम नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. एकूण १४ प्रभाग या प्रवर्गासाठी सुरुवातीला आरक्षित झाली. सोडतीद्वारे ५, ६, १०, ११, १८ व २४ हे प्रभाग महिलांसाठी राखीव झाले आहेत. तर १२, १६, १७, १९, २३, व २५ या प्रभागांमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण असे आरक्षण पडले. प्रभाग क्रमांक एक अनुसूचित जमातीसाठी आरक्षित करण्यात आला होता. या प्रभागात महिला उमेदवाराला लॉटरी लागली असून, यंदा देखील या प्रभागातून महिला उमेदवारालाच प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.प्रभाग दोन, तीन, चार, आठ, तेरा, व पंधरा हे सहा प्रभाग अनुसूचित जातीसाठी आरक्षित झाले असून, यापैकी ४, ८, १३ हे प्रभाग महिलांसाठी राखीव आहेत. या आरक्षण सोडतीनंतर नगरसेवकांमध्ये कही खुशी कही गम, अशी परिस्थिती निर्माण झाली. काहींची अपेक्षापूर्ती झाली, तर काहींचा भ्रमनिरास झाला आहे. येत्या काळात बऱ्याच राजकीय घडामोडी या प्रभाग आरक्षणानंतर घडणार आहेत. उमेदवारी जाहीर करताना खासदार उदयनराजे भोसले व सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना सर्वसमावेशक उमेदवार द्यावा लागणार आहे. आरक्षण सोडत प्रक्रिया सुमारे दोन तास सुरू होती. अभिजित बापट हे प्रत्येक टप्प्यावर आरक्षण प्रक्रियेची माहिती देऊन त्यानुसार नगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते सोडत काढण्यात येत होती.

### सर्वांत जास्त चुरशीचे सामने

प्रभाग क्रमांक ७, १४, २० आणि २२ या चार प्रभागांत सर्वसाधारण आरक्षणे पडली आहेत. त्यामुळे सर्वांत जास्त चुरशीचे सामने या चार प्रभागांत पाहायला मिळणार आहेत. सातारा विकास आघाडी व नगर विकास आघाडी या दोन्ही आघाड्यांना राजकीय संवेदनशीलता लक्षात घेऊन येथे उमेदवार द्यावे लागणार आहेत.

## पुतिनशी फोनवरून संवाद

## अदानी सिमेंट बिझनेस प्रकल्पावरून वाद

# अदानींसाठी नियम बदलायला तयार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कल्याणजवळील अदानी समूहाच्या आंबिवली परिसरातील जागेत अदानी सिमेंट बिझनेसतर्फे अंबुजा सिमेंट प्रक्रिया प्रकल्पाची २६.१३ हेक्टर जमिनीवर उभारणी करण्यात येणार आहे. स्थानिक रहिवाशांबरोबर पर्यावरणप्रेमी नागरिकांनी या सिमेंट प्रकल्पांमुळे होणारे हवा, जल प्रदूषणाच्या विषयावरून या प्रकल्पाला जोरदार विरोध दर्शवला आहे. मात्र, पर्यावरण मंत्रालयाच्या एका ताज्या प्रस्तावामुळे मुंबईजवळील कल्याण येथे प्रस्तावित सिमेंट ग्राइंडिंग युनिटला मोठे पाठबळ मिळू शकते.**

## काँग्रेस प्रवक्त्याने काय आरोप केले?



यावरून आता काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. पंतप्रधान मोदी अदानींसाठी कोणताही नियम, कायदा बदलायला तयार असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.गेल्या महिन्यात या प्रकल्पाविषयी नागरिकांच्या सूचना हरकती जाणून घेण्यासाठी जनसुनावणीचा कार्यक्रम एनआरसी शहाड भागात आयोजित करण्यात आला होता. या प्रकल्पाच्या परिसरात पाचशे ते एक हजार मीटरवर उल्हास, काळू, भातसा नदी आहेत. कल्याण, डोंबिवली, निम्म ठाणे जिल्ह्याचे हे पाणी पिण्याचे स्रोत आहेत. हे जलस्रोत या प्रकल्पामुळे प्रदूषित होतील. या भागात शाळा, महाविद्यालये, धार्मिक संस्था आहेत, रेल्वेस्थानके आहेत. त्यांना या प्रकल्पाची प्रदूषणाच्या माध्यमातून झळ बसेल. हा विनाशकारी प्रकल्प आहे, त्यामुळे हा प्रकल्प या भागात नको, अशी मते नागरिकांनी मांडली.२६ सप्टेंबर रोजी मंत्रालयाने जारी केलेल्या मसुदा अधिसूचनेत कैप्टिव्ह पॉवर प्लांट नसलेल्या एकल सिमेंट ग्राइंडिंग युनिटला 'ENVIRONMENTAL IMPACT ASSESSMENT – EIA' मंजुरी घेण्याच्या बंधनातून सूट देण्यात आली आहे. जर हा प्रस्ताव मंजूर झाला तर अदानी समूहाच्या (अदानी ग्रुपच्या) प्रस्तावित सिमेंट प्रकल्पाची (सिमेंट प्लांटची) स्थापना करणे सोपे होईल. अदानी समूहाने प्रस्तावित केलेल्या या प्रकल्पाची किंमत १४०० कोटी रुपये असेल आणि यातून दरवर्षी साठ लाख मेट्रिक टन सिमेंटचे उत्पादन केले जाऊ शकेल.हा प्रकल्प मुंबईजवळील कल्याण येथे उभारला जाणार आहे. हा प्लांट अंबुजा सिमेंट लिमिटेडचा आहे, जी अदानी समूहाच्या कंपन्यांचा एक भाग आहे. अदानी समूहाला आता दिलासा मिळत असल्याचे दिसत असले तरी या प्रकल्पाबद्दल कल्याणमधील स्थानिक लोकांमध्ये तीव्र नाराजी आहे. १५ सप्टेंबर रोजी इंडियन एक्स्प्रेसने स्थानिक रहिवाशांना भेटून त्यांची नाराजी समजून घेण्याचा प्रयत्न केला. "पण, आता जी मसुदा अधिसूचना (DRAFT) समोर आली आहे, त्यात असे म्हटले गेले आहे की, जे 'स्टँड-अलोन सिमेंट ग्राइंडिंग युनिट' असतात, ते इतर प्लांटच्या तुलनेत कमी प्रदूषण करतात, त्यामुळे त्यांच्यासाठी 'ENVIRONMENTAL IMPACT ASSESSMENT – EIA' अहवालाची आवश्यकता भासणार नाही.अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, कल्याणमध्ये जो प्लांट तयार करण्याची योजना आहे, तो 'कॅल्सीनेशन' आणि 'क्लिंकराईझेशन' या दोन प्रक्रियांतून जाणार नाही. कॅल्सीनेशनचा अर्थ कच्च्या मालाला गरम करणे असा असतो, तर क्लिंकराईझेशनचा अर्थ सिमेंटला लहान तुकड्यांमध्ये तोडणे असा होतो. पण, या दोन्ही प्रक्रिया येथे होणार नसल्यामुळे, कार्बन उत्सर्जन कमी होईल आणि टाकाऊ पदार्थदेखील कमी दिसेल असे म्हटले जात आहे. याशिवाय कच्च्या मालाची वाहतूक रेल्वे किंवा ई-वाहनांद्वारे केली जाईल, ज्यामुळे प्रदूषण कमी होईल, असेही सांगितले जात आहे.काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी 'एक्स'वर एक व्हिडीओ शेअर केला. त्यात त्यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली. त्या म्हणाल्या, "अदानींसाठी मोदीजी कोणताही नियम,लोकांना मरण येवो वा जगणं, त्यांना काहीच फरक पडत नाही. मुंबईतील अदानींच्या सिमेंट प्रकल्पासाठी आता पर्यावरणाची मंजुरी घेण्याची गरज नाही."

### जलस्रोत प्रकल्पामुळे प्रदूषित होतील

केंद्र सरकार एक नवीन नियम तयार करत आहे, ज्यानुसार कॅप्टिव्ह पॉवर प्लांटशिवाय काम करणाऱ्या सिमेंट ग्राइंडिंग युनिट्सना पर्यावरणाची मंजुरी घेण्याची गरज राहणार नाही. पर्यावरण मंत्रालयाने २६ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या आपल्या मसुदा अधिसूचनेत हा प्रस्ताव ठेवला आहे, यामुळे अदानी समूहाच्या मुंबईतील कल्याण येथील १,४०० कोटी रुपयांच्या सिमेंट प्रकल्पाचा मार्ग सोपा होईल.

# निवडणुकीत त्यांना महत्त्व नाही

## प्रशांत किशोरांबाबत केंद्रीय मंत्र्याचं महत्त्वाचं विधान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बहुप्रतिक्षित बिहार निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. राज्यात दोन टप्प्यांत निवडणुका होतील. ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान होईल आणि १४ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीची तयारी जोरात सुरू आहे. विविध राजकीय पक्ष निवडणुकीसाठी सज्ज झाले आहेत.**



नितीश कुमार, तेजस्वी यादव, प्रशांत किशोर आणि चिराग पासवान हे बिहारच्या राजकारणातील प्रमुख चेहरे आहेत.प्रशांत किशोर यंदा पहिल्यांदाच निवडणूक लढवणार आहेत. त्यांनी भाजपा नेत्यांवर केलेल्या आरोपांनी, एनडीए सरकारवर केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. याच भ्रष्टाचाराच्या आरोपांवर केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल बोलले आहेत. पीयूष गोयल कतार दौऱ्यावर असतानाच त्यांनी 'टीव्ही ९ भारतवर्ष'शी संवाद साधला आहे. यावेळी ते बिहार राजकारण आणि त्यासह त्यांच्या कतार दौऱ्याच्या महत्त्वाविषयी बोलले आहेत. पीयूष गोयल नक्की काय म्हणाले? बिहारमधील राजकीय चित्र कसे आहे? त्याविषयी जाणून घेऊयातकेंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी टीव्ही ९ भारतवर्षला दिलेल्या एका विशेष मुलाखतीत बिहार निवडणूक २०२५ आणि प्रशांत किशोर यांच्या भूमिकेवर आपले विचार मांडले आहेत.प्रशांत किशोर यांनी एनडीए सरकारवर केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांबद्दल त्यांना "या निवडणुकीत प्रशांत किशोर कोणताही महत्त्वाचा फॅक्टर नाहीत.

### काय म्हणाले पीयूष गोयल?

प्रशांत किशोर यांचा स्थानिक पातळीवर प्रभाव कमी आहे." ते पुढे म्हणाले, "बिहारची जनता खूप हुशार आहे. लोकांना चांगले माहीत आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचा विकास केला आहे.तसेच नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील डबल इंजिन सरकारने बिहारसाठी काम केले आहे. बिहारच्या जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बिहारच्या डबल इंजिन सरकारच्या कामांची नोंद घेतली आहे," असा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला.

# रामानंद सागर यांची 'रामायण' मालिका पुन्हा येणार!

22 जानेवारीला अयोध्येत (AYODHYA) प्रभू श्रीरामाच्या मंदिराचा उद्घाटन सोहळा पार पडला. राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याला 'रामायण' या लोकप्रिय मालिकेतील प्रभू श्री रामाची भूमिका साकारणाऱ्या अरुण गोविल (ARUN GOVIL) यांनी तसेच सीता मातेची भूमिका साकारणाऱ्या दीपिका चिखलिया (DIPIKA CHIKHLIA), लक्ष्मण ही भूमिका साकारणारे अभिनेते सुनील लाहिरी (SUNIL LAHRI) यांनी हजेरी लावली होती. 'रामायण' या मालिकेला प्रेक्षकांची विशेष लोकप्रियता मिळाली. आता ही मालिका पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'रामायण' कोणत्या चॅनलवर टेलिकास्ट होणार आहे? याबाबत जाणून घेऊयात...'रामायण' ही मालिका डीडी नॅशनलवर प्रसारित होणार आहे. नुकतीच याबाबत दूरदर्शन नॅशनल (डीडी नॅशनल) या चॅनलवर माहिती देण्यात आली आहे. दूरदर्शनने त्याच्या अधिकृत X (पूर्वीचे ट्विटर) हँडलवर घोषणा केली की, रामानंद सागर यांची 'रामायण' ही मालिका पुन्हा छोट्या पडद्यावर येणार आहे. दूरदर्शनने एक व्हिडीओ शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, 'पुन्हा एकदा धर्म, प्रेम आणि दानाची अलौकिक पौराणिक कथा प्रेक्षकांच्या भेटीला



येत आहे... संपूर्ण भारतातील सर्वात लोकप्रिय शो 'रामायण' लवकरच येत आहे, लवकरच डीडी नॅशनलवर रामायण पाहा."रामायण मालिका पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्यानं आता प्रेक्षकांना आनंद झाला आहे. दूरदर्शनने शेअर केलेल्या व्हिडीओला कमेंट केली 'खूप चांगला निर्णय. कृपया प्रसारणाची वेळ आणि तारीख सांगा." अनेक नेटकऱ्यांनी 'जय श्री राम' अशी कमेंट केली आहे. रामायण या मालिकेची वेळ आणि तारिख यांची माहिती अजून दूरदर्शनने दिलेली नाही.रामानंद सागर यांची रामायण ही मालिका 1987 मध्ये प्रसारित झाली होती. लॉकडाऊनमध्ये देखील ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत होती. 'रामायण' मालिकेतील संगीत लोक आजही आवडीनं ऐकतात. या मालिकेला संगीत रवींद्र जैन यांनी दिले आहे. आता 'रामायण' ही मालिका पुन्हा छोट्या पडद्यावर पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

## फारुकीच्या चाहत्याविरोधात एफआयआर दाखल

छोट्या पडद्यावरील बिग बॉस 17या कार्यक्रमाचा विजेता मुनव्वर फारुकी हा ठरला. मुनव्वर हा बिग बॉसची ट्रॉफी घेऊन डोंगरीमध्ये गेला होता. डोंगरीमधील मुनव्वरचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. आता मुनव्वरच्या एका चाहत्याच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. मुनव्वर फारुकीच्या रोड शोदरम्यान त्याच्या एका चाहत्याने बेकायदेशीरपणे ड्रोनचा वापर केला. परवानगीशिवाय रोड शोमध्ये ड्रोन कॅमेरा आणल्याप्रकरणी मुनव्वरच्या चाहत्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.मुनव्वर फारुकीच्या चाहत्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे. रिपोर्टनुसार, मुंबई पोलिसांनी मुनव्वरचा चाहता अरबाज युसूफ खानच्या नावावर एफआयआर नोंदवला आहे.

## क्रितीच्या रोमान्सची चर्चा

बॉलिवूड अभिनेता शाहिद कपूर आणि कृती सेनन सध्या त्यांच्या 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या सिनेमामुळे चर्चेत आहेत. या सिनेमात शाहिद आणि कृती यांच्या दरम्यान लव्हस्टोरी दाखवण्यात येणार आहे. सिनेमात कृती एका फिमेल रोबोटची भूमिका साकारणार आहे. शाहिद आणि कृतीचा 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' हा सिनेमा 9 फेब्रुवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, निर्मात्यांनी 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या सिनेमाचे टायटल ट्रॅक रिलीज झालं आहे. टायटल ट्रॅक निर्मात्यांनी रिलीज केले आहे. या गाण्याला टी सिरीजने युट्युब चॅनेलवर प्रेक्षकांच्या भेटीला आणले आहेत. टायटल ट्रॅकमध्ये शाहिद कपूर आणि कृती सेनन रोमान्स करताना दिसत आहेत. दोघांची केमिस्ट्री प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. आत्तापर्यंत या गाण्याला 6 मिलीयन पेक्षा जास्त लोकांनी पाहिले आहे. शाहिद आणि कृतीच्या 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या सिनेमाच टायटल ट्रॅक युट्युबवर ट्रेंड होत आहे. त्यामुळे टायटल ट्रॅकच्या तुफान चर्चा रंगल्या आहेत. 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या सिनेमात शाहिद कपूर मुख्य भूमिका साकारणार आहे. सिनेमात शाहिद एक रोबोटिक्स इंजिनिअर आहे. त्यामुळे त्याची भूमिका कृत्रीम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय भोवती फिरताना दिसणार आहे.



## सम्राट आणि कृती खरबंदाचा साखरपुडा?

बॉलिवूड अभिनेता पुलकित सम्राट आणि कृती खरबंदा सध्या एकमेकांना डेट करताना दिसत आहे. पुलकित आणि कृती अनेकदा एकत्रित स्पॉट झाल्या आहेत. दोघेही नेहमी प्रेम व्यक्त करताना मागे पुढे पाहत नाहीत. पुलकित सम्राट आणि खरबंदा नेहमीच चर्चेत असतात. दरम्यान आता दोघांबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. दोघांनी साखरपुडा उरकला असल्याचे बोलले जात आहे. पुलकित सम्राट आणि खरबंदा यांची काही फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. या फोटोंमध्ये दोघेही रिंग घातलेली दिसत आहे. दरम्यान, दोघांनी आता साखरपुडा उरकला असल्याचे बोलले जात आहे. मात्र, दोघांपैकी कोणीही अद्याप याला दुजोरा दिलेला नाही. रिया लथूरा या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन काही फोटो शेअर करण्यात आले आहेत. या फोटोंमध्ये पुलकित आणि खरबंदा इतर काही लोकांसमवेत दिसत आहेत. पुलकित सम्राट आणि कृतीने नुकतेच त्यांच्या मित्राच्या घरी हा सोहळा आयोजित केला होता. या खास दिवसाची दोघांनी जंगी तयारी केली होती. अभिनेत्री कृती खरबंदा आणि पुलकित सम्राट यांच्या नात्याबाबत चर्चा सुरु आहेत. सोशल मीडियावर त्यांच्या साखरपुड्याबाबत चर्चा सुरु झाल्याने चाहते आनंदी होताना दिसत आहेत. याशिवाय दोघांनीही अनेक सिनेमांत देखील काम केले आहे. दोघांचे एकत्रित फोटो तुफान व्हायरल झाले आहेत. पुलकितच्या बॉलिवूडमधील कामाबाबत बोलायचे झाले तर नुकताच त्याचा 'फुकरे 3' रिलीज झाला होता. तर कृतीचा 'रिस्की रोमियो' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. अभिनेत्री कृती खरबंदा आणि पुलकित सम्राट यांनी एकत्रितपणे अनेक सिनेमे केले आहेत. 'वीरे द वेडिंग' आणि 'पागलपंती' यांसारख्या सिनेमांमधून ते प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. दोघांची लवस्टोरी सिनेमांच्या सेटवरुनच सुरु झाली आहे.

## फायटरचा बॉक्स ऑफिसवर धमाका सुरुच

सिद्धार्थ आनंदच्या फायटरने बॉक्स ऑफिसवर 240 कोटींचा टप्पा पार केलाय. जगभरातील प्रेक्षकांचा सिनेमाला तुफान प्रतिसाद मिळत आहे. बॉक्स ऑफिसच्या अहवालांनुसार, फायटरच्या दमदार पदार्पणानंतर त्याने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली आहे. चित्रपटाची आकर्षक कथा प्रेक्षकांना मोहित करून गेली आहे. देशांतर्गत कलेक्शन 132 कोटींच्या पुढे गेलं असून आंतरराष्ट्रीय दर्शकांसोबतही चित्रपटाला 240 कोटीचा टप्पा पार केलाय.सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित केलेल्या फायटरमध्ये अभिनेत हृतिक रोशन, दीपिका पदुकोण आणि अनिल कपूर प्रमुख भूमिकेत आहेत.आणि संयुक्त विद्यमाने सिनेमाची निर्मिती करण्यात आली आहे. फायटरमध्ये ) नौदलाच्या समर्पणाबाबत आणि त्यागाबाबत भाष्य करण्यात आले आहे. 26 जानेवारीच्या पूर्वसंध्येला देशभक्तीवर आधारित सिनेमा रिलीज झाला होता. फायटरच्या पत्रकार परिषदेतील आणि स्क्रीनिंगचे फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. सिद्धार्थ आनंदचा पठाण हा सिनेमा गेल्या वर्षी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. सिनेमानी बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली होती. दीपिकाच्या बिकनीमुळे पठाण वादाच्या भोवऱ्यातही सापडला होता. पठाणनंतर आता फायटर देखील बंप्पर कमाई करताना दिसत आहे. अभिनेता हृतिक रोशन आणि अभिनेत्री दीपिका पादुकोण यांचा 'फायटर' हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलाय. रिलीजच्या पहिल्या आठवड्यातच या सिनेमाने 100 कोटींचा टप्पा पार केला होता 'फायटर'ला प्रेक्षकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.



हर्षितचा व्हायरल व्हिडीओ

## हर्षितचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

# मी काय तुझी गर्लफ्रेंड आहे का?

## हर्षितला मुळीच आवडत नाही



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघात स्थान मिळवणं मुळीच सोपं नाही. स्थान मिळाल्यानंतर प्लेइंग ११ मध्ये स्थान मिळणं हे त्याहून कठीण काम आहे. पण हर्षित राणा असा एकमेव गोलंदाज आहे, ज्याने कमी वेळात तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतीय संघात स्थान निश्चित केलं आहे. पण त्याला सोशल मीडियावर प्रचंड ट्रोल केलं जात आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठीही त्याची भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. दरम्यान त्याच्या एअरपोर्टवरील एक व्हिडीओ तुफान व्हायरल होऊ लागला आहे. नेमकं काय घडलं? जाणून घ्या.**

आंतरराष्ट्रीय खेळाडूला पाहून प्रत्येक क्रिकेट चाहत्याला असं वाटतं की, खेळाडूसोबत एकतरी फोटो क्लिक करावा. त्यामुळे क्रिकेट चाहते खेळाडूच्या जवळ पोहोचण्यासाठी धडपड करतात. दरम्यान ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी निवड झालेला हर्षित राणा एअरपोर्टच्या आत एन्ट्री मारत होता, त्यावेळी एका चाहत्याने त्याच्यासोबत फोटो काढण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावेळी हर्षित राणाने जे काही म्हटलं, ते पाहून सर्वांनाच हसू अनावर झालं.व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, हर्षित राणा आपली बॅग घेऊन एअरपोर्टच्या आत जाताना दिसून येत आहे. त्यावेळी एक चाहता येतो आणि त्याच्यासोबत फोटो काढण्यासाठी उभा राहतो. पण त्याआधी तो चाहता हर्षितच्या हातात हात घालण्याचा प्रयत्न करतो. दरम्यान हे हर्षितला मुळीच आवडत नाही. त्यावेळी तो म्हणतो, “मी गर्लफ्रेंड आहे का तुझी?” हे ऐकताच एअरपोर्टवर असलेले सर्व लोकं हर्षितकडे पाहू लागतात आणि हसू लागतात. हर्षितचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होऊ लागला आहे.फोटो काढण्याची विनंती करणाऱ्या चाहत्याने आधी हातात हात घातला, पण हर्षितने लगेचच हात झटकला. त्यानंतर हर्षितने चाहत्यासोबत फोटो क्लिक केला. हर्षित राणाचा ऑस्ट्रेलियाविरूद्ध होणाऱ्या वनडे आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. याआधी आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील विजेत्या संघातही हर्षित राणाच्या नावाचा समावेश करण्यात आला होता. आता ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर तो कशी कामगिरी करणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. आंतरराष्ट्रीय खेळाडूला पाहून प्रत्येक क्रिकेट चाहत्याला असं वाटतं की, खेळाडूसोबत एकतरी फोटो क्लिक करावा. त्यामुळे क्रिकेट चाहते खेळाडूच्या जवळ

### ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी निवड

मात्र त्याला या संधीचा फायदा उठवता आला नाही. वनडे संघातून डच्चू देण्यात आल्याने लबूशेन ॲशेस मालिकेसाठी शेफील्ड शिल्डचे सामने खेळून तयारी करू शकतो. रेनशॉने ऑस्ट्रेलिया ए संघासाठी खेळताना सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. सध्या तो मधल्या फळीत खेळत आहे मात्र ॲशेस मालिकेसाठी त्याचा सलामीवीर म्हणून विचार होऊ शकतो.

पोहोचण्यासाठी धडपड करतात. दरम्यान ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी निवड झालेला हर्षित राणा एअरपोर्टच्या आत एन्ट्री मारत होता, त्यावेळी एका चाहत्याने त्याच्यासोबत फोटो काढण्याची इच्छा व्यक्त केली.

त्यावेळी हर्षित राणाने जे काही म्हटलं, ते पाहून सर्वांनाच हसू अनावर झालं.व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, हर्षित राणा आपली बॅग घेऊन एअरपोर्टच्या आत जाताना दिसून येत आहे. त्यावेळी एक चाहता येतो आणि त्याच्यासोबत फोटो काढण्यासाठी उभा राहतो. पण त्याआधी तो चाहता हर्षितच्या हातात हात घालण्याचा प्रयत्न करतो. दरम्यान हे हर्षितला मुळीच आवडत नाही. त्यावेळी तो म्हणतो, “मी गर्लफ्रेंड आहे का तुझी?” हे ऐकताच एअरपोर्टवर असलेले सर्व लोकं हर्षितकडे पाहू लागतात आणि हसू लागतात. हर्षितचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होऊ लागला आहे.

फोटो काढण्याची विनंती करणाऱ्या चाहत्याने आधी हातात हात घातला, पण हर्षितने लगेचच हात झटकला. त्यानंतर हर्षितने चाहत्यासोबत फोटो क्लिक केला. हर्षित राणाचा ऑस्ट्रेलियाविरूद्ध होणाऱ्या वनडे आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. याआधी आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील विजेत्या संघातही हर्षित राणाच्या नावाचा समावेश करण्यात आला होता. आता ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर तो कशी कामगिरी करणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# रोहित कधीच सातत्याने धावा करत नाही

## कर्णधारपद गेल्यानंतर माजी खेळाडूचं हिटमॅनबाबत मोठं विधान



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू व्हायला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. या दौऱ्यावर भारतीय संघ ३ वनडे आणि ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहेत. या दौऱ्यासाठी युवा फलंदाज शुबमन गिलची वनडे संघाचा कर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. विराट आणि रोहित संघाचा भाग असणार आहेत.**

पण दोघांसमोर चांगली कामगिरी करून संघात स्थान टिकवण्याचं आव्हान देखील असणार आहे. दरम्यान भारतीय संघाचा माजी खेळाडू मोहम्मद कैफने विराट आणि रोहितबाबत मोठं वक्तव्य केलं आहे.रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांनी टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. दोघे केवळ वनडे क्रिकेट खेळताना दिसून येणार आहेत.आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेतील अंतिम सामना झाल्यानंतर विराट आणि रोहितने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. तर इंग्लंड दौऱ्याआधी दोघांनीही इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करून

### फ्लॉप ठरले, तर काय होणार?

त्याची कारकिर्द अशीच पुढे सरकली आहे. तो सातत्याने धावा करू शकलेला नाही.”जर विराट- रोहितची जोडी ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या मालिकेत धावा करण्यात अपयशी ठरली, तर काय? या प्रश्नाचं उत्तर देताना मोहम्मद कैफ म्हणाला, “जर दोघेही या मालिकेत फ्लॉप ठरले, तर काय होणार? लोकं म्हणतील, दोघंही फॉर्ममध्ये नाहीत.

निवृत्तीची घोषणा केली होती. चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर दोघांनाही फार क्रिकेट खेळण्याची संधी मिळालेली नाही. आयपीएलनंतर पहिल्यांदाच दोन्ही फलंदाज मैदानात उतरणार आहे. त्यामुळे दोघांवरही दबाव असेल, यात काहीच शंका नाही.आपल्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना मोहम्मद कैफ म्हणाला, “लोकं म्हणत आहे की, विराटच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल. पण हे रोहितसाठीही लागू होतं. गेल्या काही वर्षांत तो २०-३० धावांची खेळी करतोय आणि मोठा सामना येतो तेव्हा ८० धावांची सामना जिंकवणारी खेळी करतो.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार।

। दि. 9 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## नेत्रचिकित्सा शिबीर : सर्वसामान्य नागरिकांची

# रुग्णसेवा हीच खरी ईश्वर सेवा!

### शिवराज लांडगे यांचा पुढाकार; - इंद्रायणी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा नीलम लांडगे यांचे सहकार्य





। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंद्रायणी नगरमध्ये झालेल्या मोफत नेत्रचिकित्सा शिबिरातून स्थानिक नागरिकांना दिलासा मिळाला आहे. भारतीय जनता पक्षाचे इंद्रायणी नगर मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे आणि इंद्रायणी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा नीलम लांडगे यांच्या पुढाकारातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली "सेवा पंधरवडा" या उपक्रमाअंतर्गत आयोजित शिबिरामध्ये 63 रुग्णांची मोफत मोतीबिंदू ऑपरेशनासाठी निवड करण्यात आली असून, ही शस्त्रक्रिया टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. त्याचबरोबर 353 नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले आहे. डोळ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर गुंतागुंत होऊ शकते, हे ओळखून नागरिकांना घराच्या दारापर्यंत नेत्रचिकित्सा सेवा पोहोचवण्याचा अभिनव प्रयत्न यामागे आहे.

शिबिराचे आयोजन इंद्रायणी नगर, सेक्टर 12 येथील बी-क्लस्टर क्लब हाऊस, स्वराज्य नगरी येथे करण्यात आले होते. शिबिरात नेत्रतपासणी, मोतीबिंदू निदान, चष्मा वाटप आणि उपचाराचे मार्गदर्शन देण्यात आले.

#### समाजभान जपणारा उपक्रम...

या शिबिरामुळे अनेक नागरिकांना वेळेवर उपचार मिळून अंधत्व टाळण्यास मदत झाली. "नागरिक त्यांच्या व्यस्त दिनचर्येमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. डोळ्यांसारख्या संवेदनशील बाबतीत याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. हे लक्षात घेऊनच मोफत आणि दर्जेदार सेवा थेट नागरिकांच्या दारात पोहोचवण्याचा संकल्प केला आहे," असे शिवराज लांडगे यांनी सांगितले.

#### पुढील उपक्रमांची तयारी....

केवळ एकदाच नव्हे, तर या धर्तीवर भविष्यातही अनेक आरोग्यविषयक शिबिरे आयोजित करून अधिकाधिक लोकांपर्यंत ही सेवा पोहोचवण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला आहे. शिवराज लांडगे यांच्या सामाजिक बांधिलकीची जाणीव देणारा आणि अनेकांना दृष्टी देणारा हा उपक्रम खरंच कौतुकास्पद ठरत आहे.

> "डोळ्यांचा प्रकाश ही केवळ दृष्टी नव्हे, तर माणसाच्या जगण्याची दिशा असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला योग्य वेळी आरोग्यसेवा मिळाली पाहिजे, हाच आमचा खरा संकल्प आहे. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे गरजूंच्या सेवेसाठी सतत कार्यरत राहणार आहोत."
> **- शिवराज लांडगे,** मंडल अध्यक्ष, भाजपा.

## MSDP अंतर्गत महिलांसाठी कृषी, अन्नप्रक्रिया विशेष प्रशिक्षण उत्साहात

### महिला सक्षमीकरणाचा संकल्प: माजी नगरसेवक शांताराम बापू भालेकर यांचा पुढाकार !

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय उद्यमिता विकास संस्था (EDII), ॲक्सेंचर आणि महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या संयुक्त विद्यमाने मायक्रो स्किलप्रेन्योरशिप डेव्हलपमेंट प्रोग्राम (MSDP) अंतर्गत कृषी, बाजारपेठ व अन्नप्रक्रिया उत्पादनांवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम रुपी नगर, पुणे येथे यशस्वीरीत्या पार पडला. हा कार्यक्रम ३ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आला.**



प्रशिक्षणाचा समारोप ७ ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडला. या वेळी माजी नगरसेवक शांताराम बापू भालेकर, EDII चे मॅनेजर भगवान हरकळ, माविमच्या एरिया को-ऑर्डिनेटर ज्योती हेलवे, तसेच मास्टर ट्रेनर अमृता गोडसे यांच्या उपस्थितीत सहभागी महिलांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश महिलांना स्वावलंबन, उद्यमशीलता व स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीकडे प्रवृत्त करणे असा होता. प्रशिक्षणामध्ये व्यवसाय नियोजन, वित्तीय व्यवस्थापन, विपणन कौशल्य, गुणवत्ता नियंत्रण, तसेच आधुनिक अन्नप्रक्रिया तंत्रज्ञानाचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

> "महिलांना उद्यमशीलतेच्या प्रवासात सक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. अशा प्रशिक्षणांमुळे त्या आत्मविश्वासाने पुढे येतात, आर्थिकदृष्ट्या सक्षम होतात आणि समाजाच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलतात."अशा प्रकारचे प्रशिक्षण महिलांच्या आत्मविश्वासात भर घालतात, त्यांचे जीवनमान उंचावतात व समाजात त्यांचा सक्रीय सहभाग वाढवतात." तसेच त्यांनी शासकीय योजनांचा लाभ घेणे, स्थानिक संसाधनांचा वापर व विपणनाच्या संधींचा योग्य वापर करावा.
> **- शांताराम बापू भालेकर,** माजी नगरसेवक.

प्रशिक्षणादरम्यान महिलांनी विविध उद्योजकीय कल्पना मांडल्या असून, स्वतःची उत्पादने बाजारात आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अखेरीस मान्यवरांनी सहभागी महिलांचे विशेष कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल उद्योजकीय प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

### वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या होर्डिंग्ज काढण्याचे कामही युद्धपातळीवर

# वाकड–मामुर्डी दरम्यान सेवा रस्त्यांच्या कामाला सुरुवात

## आमदार शंकर जगताप यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**अखेर वाकड ते मामुर्डी दरम्यानच्या सेवा रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्ष सुरूवात झाली आहे. वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या होर्डिंग्ज काढण्याचे कामही युद्धपातळीवर सुरू असून, नागरिकांना लवकरच वाहतूक कोंडीच्या त्रासातून मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी काही दिवसांपूर्वी या परिसरात पाहणी दौरा करत संबंधित अधिकाऱ्यांना काम तातडीने सुरू करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यांच्या निर्देशानंतरच आज प्रत्यक्ष कामाला गती मिळाली आहे.

कामाची सुरुवात होताच ठिकठिकाणी डांबरीकरण, अतिक्रमण हटविणे, सर्विस लाईन शिफ्ट करणे आणि वाहतूक मार्ग मोकळा करणे अशी कामे हाती घेण्यात आली आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पिंपरी चिंचवड महानगरपालिका , वाहतूक विभाग, आणि महावितरण या सर्व यंत्रणांचा यात समन्वय राखला जात आहे.

आमदार जगताप यांनी स्पष्ट केले की, “या भागातील नागरिकांना गेल्या वर्षभरापासून वाहतूक कोंडीचा मोठा त्रास होत आहे. त्यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून सर्व्हिस रोडची कामे हाती घेतली असून ती नियोजित वेळेत पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.”

दरम्यान, भुजबळ चौक ते भूमकर चौकापर्यंतचे काम मोठ्या प्रमाणात पूर्ण झाले असून, आता उर्वरित सेवा रस्त्यांचे काम जलद गतीने पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

या ठिकाणी वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या होर्डिंग्ज, झाडे, कंटेनर आणि अतिक्रमणे हटविण्याचे कामही सुरू आहे. काम पूर्ण झाल्यानंतर या परिसरातील वाहनचालकांना सुरळीत आणि सुलभ प्रवासाचा अनुभव मिळेल, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला आहे.

# आयुक्त शेखर सिंहांची कारकीर्द अन् उपमुख्यमंत्री अजित पवारांचे अपयश!

## बदलीनंतर सामान्य पिंपरी-चिंचवडकरांची भावना: जलने वाले जलते रहेंगे... सिंग इज अलवेज किंग रहेंगे..!

। पिंपरी चिंचवड ।
अविनाश आदक : महाईन्यूज

**आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका म्हणून लौकीक असलेली पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासकीय सत्ताकाळात सर्वाधिक चर्चेत आणि आरोपांच्या कचाट्यात सापडली. राजकीय उद्देशाने... उद्वेगाने आणि व्यक्तिद्वेशाने झालेले आरोप पिंपरी-चिंचवडची सर्वदूर बदनामी करण्यासाठी पुरेसे ठरले. यातून काय हासिल झाले? हा महत्त्वाचा मुद्दा आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचा कार्यकाळ संपला, तसा पुन्हा आरोपांचा वनवा उठला. पण, PCMC आयुक्त शेखर सिंह यांनी कारकीर्द यशस्वी पूर्ण ~~केली आणि यामध्ये उपमुख्यमंत्री~~ अजित पवारांचे अपयश अधोरेखित झाले, ही वस्तुस्थिती आहे.**




मार्च- 2022 मध्ये महापालिकेत नगरसेवकांचा कार्यकाळ संपला आणि राज्यात कोणत्याही एका पक्षाची निर्विवाद सत्ता नाही. (तीन पक्षांचे सरकार) त्यामुळे विरोधाच्या भूमिकेत असलेले नेते, पदाधिकारी आणि विशिष्ट उद्देशाने काम करणारे कथित पत्रपंडित यांनी 2022 मध्ये प्रस्तावित असलेली महानगरपालिका आणि 2024 मधील विधानसभा निवडणूक ‘फोकस’ केली. “प्रशासकीय कारभार आणि आरोपांचा भडीमार” हा अजेंडा राबवला. ‘सॉफ्ट टार्गेट’ झाले आयुक्त शेखर सिंह. मात्र, अखेरपर्यंत आयुक्त शेखर सिंह यांची आपली कारकीर्द “सिंग इज किंग” प्रमाणे गाजवली...आणि तितकीच निर्भिडपणे राबवली.

उपमुख्यमंत्री अजित पवार महाविकास आघाडी आणि महायुती अशा दोन्ही सत्तांतराच्या काळात “पर्मनंट डीसीएम” म्हणून राहीले आहेत. भाजपा महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सहभागी झाली. त्यावेळी राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी अत्यानंद झाला होता. कारण, “अजितदादा आता भाजपासह महेशदादाला सुट्टी देत नसतात..” असा ‘ओव्हरकॉन्फिडन्स’ होता. पण, याउलट परिस्थिती पहायला मिळाली.

कुदळवाडीतील 1000 एकर क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेड आयुक्त शेखर सिंह यांच्या मदतीने आमदार महेश लांडगे यांनी भुईसपाट केली. पिंपरी-चिंचवडचा सुधारित विकास आराखडा (DP) तयार केला. त्यावर आरोप झाले. भामा आसखेडच्या जॅकवेलचा मुद्दा... वाकडमधील ‘टीडीआर’चा मुद्दा... झोपडपट्टी पुनर्वसनचा मुद्दा...केबल डक्ट...यासह महापालिकेची आर्थिक स्थिती...यावरुन रान पेटवण्यात आले. मात्र, आयुक्त शेखर सिंह यांच्यावर कसलीही चौकशी नाही किंवा कारवाई झाली नाही.

विकास आराखड्यात आळंदी परिसरात प्रस्तावित केलेला कत्तलखाना आरक्षण रद्द करण्यासाठी राष्ट्रवादीचे स्थानिक नेते अजित पवार यांच्याकडे गाऱ्हाणे घेवून घेतले. अजितदादांनी सांगितले... दोन महिन्यांत आयुक्तांची बदली होईल. पण, आयुक्तांनी आपला कार्यकाळ पूर्ण केला. याहून आयुक्तांची बदली करा... म्हणून सातत्याने तगदा लावणाऱ्या राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांना सत्तेत सहभागी असताना, तसेच उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार असतानाही पिंपरी-चिंचवडमधील आयुक्तांनी निर्णय घेतलेले एकही काम थांबवता आले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

**आयुक्तांची उचलबांगडी नव्हे, पदोन्नती...!**

आयुक्त शेखर सिंह यांची बदली म्हणजे उचलबांगडी असा जावईशोध काही पत्रपंडितांनी आणि कथित समाजसेवकांनी लावला. पण, आयुक्त शेखर सिंहांनी कार्यकाळ पूर्ण केला आणि “नाशिक कुंभमेळा” सारख्या भाजपा महायुती सरकारच्या “हाय होल्टेज इव्हेंट” ची जबाबदारी मिळवली. या मेळाव्यात राज्य सरकार आणि केंद्र सरकारचा सहभाग असणार आहे. त्याची तयारी अत्यंत प्रभावीपणे सुरू आहे. या कुंभमेळाचे ‘बजेट’ ऐकले, तर टीकाकारांचे डोळे विस्फारतील. तब्बल 24 हजाराहून अधिक कोटींचे बजेट असलेला हा सोहळ्याचे सनदी अधिकारी शेखर सिंह प्रशासकीय प्रमुख झाले आहेत.

**तडकाफडकी नव्हे, सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करुनच बदली..!**

“आयुक्त शेखर सिंह यांची तडकाफडकी बदली केली...” असा दावा केला जातो. तो अक्षरश: हास्यास्पद आहे. कारण, आयुक्तांनी पिंपरी-चिंचवड शहराचे भविष्य असलेला DP सादर केला. राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला. महापालिका निवडणुकीची प्रारुप प्रभाग रचना पूर्ण झाली. ती अंतिम झाली. कथित पत्रपंडित आणि टीकाकारांनी प्रभाग रचनेवरुन रान पेटवले. मात्र, 318 हरकतींपैकी केवळ 6 ठिकाणी काहीसा बदल करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजित पवार गटाला साधे आपले प्रभाग कायम ठेवता आले नाहीत. हातात असलेल्या सर्व जबाबदारी पूर्ण करुन आयुक्त शेखर सिंह निरोप घेत आहेत, ही बाब खरं तर टीकाकारांना आत्मचिंतन करायला लावणारी आहे.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046